# नियमित दिवाणी दावा नं.–३४६/२०१६ मधील नि.४२ वरील आदेश

(CNR No.MHST120008062016)

१. अर्ज व म्हणणे वाचले. वादीने प्रस्तुतचा दावा हा सरस निरस मानाने वाटणीकरीता दाखल केले आहे. वादीने प्रस्तुत दुरूस्ती अर्ज हा प्रतिवादी नं. ९ साहेबराव राजाराम दिडवाघ हे मयत झाला असून त्याचे वारस हे प्रतिवादी नं. १० ते १३ हे अभिलेखावर आहे प्रतिवादी नं. ९ याचे नावाचे पुढे ''मयत'' असे दुरूस्ती होणेकरीता दाखल केला आहे. प्रतिवादीने म्हणणे दाखल करून अर्ज नामंजूर करणेची विनंती केली.

२. वादींतर्फे विधीज्ञ श्री. एस.एम.माने व प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री.एस.बी. कोळेकर यांनी अर्जात व म्हणण्यात नमूद मजकूराप्रमाणे युक्तीवाद केला.

३. वर नमूद बाबींचा व संपूर्ण संचिकेचे अवलोकन केले असता असे दिसून आले की, प्रस्तुतचा दावा हा वाटणीकरीता दाखल आहे. वादीने मृत्यू प्रमाणपत्राची प्रत दाखल केली नाही. प्रस्तुत दावा प्रलंबित असताना प्रतिवादी नं. ९ हा मयत झाला. त्याचे वारस हे प्रतिवादी नं. १० ते १३ हे दाव्यात सामिल आहेत. प्रतिवादी नं.९ नावाचे पुढे "मयत" असे नमूद करणेची विनंती केली आहे.

४. प्रतिवादी नं.९ याने त्याची कैफियत नि.३९ वर दि. ०७/०३/२०१९ रोजी दाखल केले आहे. प्रस्तुत कैफियत दाखल केलेवर प्रतिवादी नं.९ हा मयत झालेचे दिसते. प्रतिवादीचे वकीलानी नि.४१ वर पुरसीस दाखल करून कळविले की दि. १५/१२/२०२० रोजी प्रतिवादी नं. ९ हा मयत झाला आहे. परंतु वादीने प्रतिवादी नं.९ मयत झाले बाबत सरनाम्यात त्वरीत दुरूस्ती करणे गरजेचे होते परंतु सुमारे १० महिन्यानंतर प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

५. सदर अर्जातील प्रस्तावित दुरुस्ती पाहता ती तांत्रीक स्वरुपाची असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. सदर प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुप बदलणार

नाही.

६. वर नमूद बाबींचा व संचिकेचे अवलोकन करता असे दिसून आले की, प्रस्तुत दुरुस्तीमुळे दाव्याच्या अंतिम निकालावर निर्माण होणाऱ्या उभय पक्षकारांतील वादप्रश्नांचे निरसन होण्यास मदत होईल. प्रतिवादी नं १० ते १३ हे मयत प्रतिवादी नं.९ याचे वारस असल्याचे प्रस्तुत अर्जात नमूद आहे.

सबब, वरील सर्व बाबींचा विचार केला असता मला खालील आदेश पारीत करणे न्यायोचित वाटते.

**आदेश**

.१. वादीचा नि.४२ वरील अर्ज हा खर्च रू. १००/– वर मंजूर करण्यात येत आहे. सदर खर्चाची रक्कम रू. १००/– हे प्रतिवादी नं. १० ला देण्यात यावे.

.२. वादीने नि.४२ प्रमाणे दुरुस्ती ही आजपासून १४ दिवसांचे आंत करुन, दाव्याची दुरुस्ती प्रत द्यावी.

.३. संबंधीत लिपीकाने सदरची दुरुस्ती नोंदी दाव्याचे रजिस्टरला करावी.

*(खुल्या न्यायालयात न्यायासनावरुन घोषित केले.)*

Sd/–

**(गजेंद्र म. कोल्हापुरे)**

दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, म्हसवड.

म्हसवड

दि.–२१/१०/२०२१

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Vishal Shamsundar Musale, Stenographer |
| Name of Court | C.J.J.D.,Mhaswad, Tal.Man |
| Date of Dictation | 21/10/2021 |
| Order signed by the P.O. on | 22/10/2021 |
| Order uploaded on | 22/10/2021 |